वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि. १७ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची धावती गाडी जप्त

## बीडच्या इतिहासातील पहिलीच घटना; माजलगाव कोर्टाचा निर्णय

Email.- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email.-editordivyawarta@gmail.com



### आदेशानंतर पैसे दिले नाहीत

कोर्टाने अनेक वेळा शेतकऱ्यांना मोबदला देण्याचे आदेश दिले. त्यानंतरही शेतकऱ्यांना मोबदला दिली नाही, यामुळे कोर्टाने सर्व प्रकार समजून घेत जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दिले. त्यानंतर जिल्हाधिकारींची धावती गाडी जप्त करण्यात आली. माजलगाव कोर्टाने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या वाहनाच्या जप्तीच्या आदेश काढल्यानंतर जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान बीडच्या जिल्हाधिकारी कचेरी कार्यालयातून ही गाडी जप्त करण्यात आली आहे.

बीड, (दिव्य न्युज):- राज्यात सध्या बीड जिल्ह्याची सर्वाधिक चर्चा होत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे राज्याचे लक्ष बीड जिल्ह्याकडे आहे. यामुळेच बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची सूत्र अजित पवार यांनी घेतली. अजित पवार यांचे पालकत्व असलेल्या बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांची धावती गाडी जप्त करण्यात आली आहे. बीडच्या जिल्हाधिकारींची गाडी जप्त होण्याची ही बीडच्या इतिहासातील पहिलीच घटना आहे.

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील चिखल बीड येथे १९९८ मध्ये लघु सिंचन प्रकल्प उभारण्यात आला होता. या प्रकल्पासाठी तीन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या होत्या. त्या शेतकऱ्यांना तुटपुंजा मोबदला दिला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. १९९८ पासून संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा अद्याप मिळालाच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना ३२ लाखांची भरपाई देण्याचे आदेश माजलगाव न्यायालयाने दिले. त्यानंतर शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाही. नऊ वर्षांपासून पैसे मिळत नसल्याने शेतकरी हातबल झाले होते. शेतकऱ्यांनी अखेर कोर्टात धाव घेतली. कोर्टाने शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला.

बीड जिल्हाधिकाऱ्यांना कोर्टाने चपराक बसली आहे. आठ दिवसांपूर्वी अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्री म्हणून पहिली बैठक घेतली होती. त्यानंतर सोमवारी जिल्हाधिकारींची गाडी जप्त करुन बीड कोर्टात आणण्यात आली. आता न्यायालय काही दिवस हे पैसे जमा होण्याची वाट पाहणार आहे. त्यानंतर पैसे भरले नाही तर जिल्हाधिकाऱ्यांच्या गाडीचा लिलाव करण्याचे आदेश न्यायालय देऊ शकतील, असे वकिलांनी सांगितले. दरम्यान, गाडी जप्त केल्यानंतर गाडीवर अंबर दिवा झाकण्यात आला आहे.

---

सुरेश धस पुन्हा आक्रमक

## धनंजय मुंडेंच्या मंत्रीपदाच्या काळातील कृषी विभागाच्या निर्णयांची माहिती मागवली

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून भाजप आमदार सुरेश धस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांच्यातील आरोप-प्रत्यारोप सुरूच आहेत. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये झालेल्या भेटीमुळे वाद मिटल्याची चर्चा होती. मात्र, आता सुरेश धस यांनी पुन्हा आक्रमक भूमिका



घेत कृषी विभागाच्या भ्रष्टाचारावर निशाणा साधला आहे.आमदार सुरेश धस यांनी कृषी विभागाच्या सचिवांना पत्र पाठवून धनंजय मुंडे

---

## २६० अधिकारी, कर्मचाऱ्यांनी लाचखोरीतून कमावली करोडोंची मालमत्ता

बीड, (दिव्य न्युज):- गलेलठ्ठ पगार असतानाही प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी गरिबांच्या खिशावर दरोडा टाकत आहेत. याच लाचखोरीच्या पैशांतून ११ वर्षांत २६० जणांनी करोडो रुपयांची मालमत्ता जमा केली आहे. कायदे कडक केले जात असले तरी

### गरिबांच्या खिशावर दरोडा!

भ्रष्टाचार काही केल्या थांबत नसल्याचे समोर आले आहे.

रिक्षाचालकाकडून ३०० रुपयांचा हप्ता घेण्यापासून ते लाखो, करोडो रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी आतापर्यंत राज्यात अनेक बडे मासे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या गळाला लागले

---

खून प्रकरणात फरार असलेल्या बबन गित्तेला दणका?

## संपत्ती जप्त करण्याच्या हालचाली

परळी, (दिव्य न्युज):- परळी तालुक्यातील मरळवाडी गावचे सरपंच बापू आंधळे यांच्या खून प्रकरणात फरार असलेल्या बबन गित्तेच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कारण आठ महिन्यांहून अधिक काळ फरार असलेल्या बबन गित्तेभोवती कायद्याचा फास आवळला जाणार असून त्याची संपत्ती जप्त करण्याच्या हालचाली प्रशासनाकडून सुरू करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी गित्ते याच्या संपत्तीची माहिती मागवली असून त्याची संपत्ती जप्त करण्यासाठी न्यायालयात अर्ज केला जाणार असल्याचे समजते.मरळवाडी गावचे अजित पवारांच्या नेतृत्वाखालील



---

भाजप बुथप्रमुखाच्या हत्येनंतर कुटुंबाच्या भेटीपेक्षा

## बावनकुळेंना सेटलमेंटची भेट महत्त्वाची वाटली

केज, (दिव्य न्युज):- भाजप आमदार सुरेश धस आणि राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घडवून आणणाऱ्या भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर मयत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी निशाणा साधला आहे. १० वर्षांपासून भाजपचे बुथप्रमुख असणाऱ्या संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर त्यांच्या कुटुंबियांना भेटण्यापेक्षा चंद्रशेखर



बावनकुळे यांना मुंडे आणि धस यांची सेटलमेंटसाठी भेट घडवून आणणं महत्त्वाचं वाटलं, याचा आम्हाला खेद वाटतो, अशा शब्दांत धनंजय देशमुख यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

पुढे बोलताना धनंजय देशमुख म्हणाले की, बुथप्रमुख हा कोणत्याही पक्षाचा पाया असतो. संतोष अण्णा देशमुख हे १० वर्षांपासून भाजपचे बुथप्रमुख म्हणून काम करत होते. पण त्यांची हत्या झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना आणि गावकऱ्यांना

---

## निधीअभावी काळवटी साठवण तलावाच्या उंचीवाढीचे काम रखडले

अंबाजोगाई ,(दिव्य न्युज):- अंबाजोगाई तालुक्यातील काळवटी साठवण तलावाच्या उंचीवाढीसाठी ३.९४ कोटी रुपयांचा निधी नगर परिषदेने द्यावयाचा होता. परंतु अद्यापही नगर परिषदेच्या निधी उपलब्ध करून दिला नसल्याने उंचीवाढीचे काम रखडले आहे. त्यामुळे हा निधी लवकरात लवकर उपलब्ध करून घ्यावा असे पत्र बीड पाटबंधारेच्या उपअभियंत्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने ६ सप्टेंबर २०१९ रोजी मंजूर केलेल्या शासन निर्णयानुसार, काळवटी तलावाच्या उंचीवाढीला मंजुरी मिळाली

---

## संतोष देशमुखांच्या हत्येत भाजपचा हात?,सुरेश धसांचा वापर-संजय राऊत

मुंबई, (दिव्य न्युज):- सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीनंतर धस यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सुरेश धस हे संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा वापर करून घेत असल्याचा आरोप होत असताना या हत्या प्रकरणात भाजपचा हात आहे का? हे तपासावे लागेल, असे वक्तव्य शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केले आहे.



संजय राऊत म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांचे नेतृत्व उभं राहिलं. ते निवडणुकीनंतर आंदोलन करणार होते. त्यांच्या आंदोलनामध्ये मराठा समाजामध्ये, त्यांच्या आंदोलनाची धार कमी करण्यासाठी भाजाने धस हा मोहरा मराठा समाजाचा मोहरा पुढे आणला. या खून प्रकरणात भाजपचा हात आहे का? लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी , हे पाहावे लागेल, असे संजय राऊत म्हणाले.

---

## अजित पवारांनीच धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचा निर्णय घ्यावा

### महायुतीच्या मंत्र्यांचे स्पष्ट मत

मुंबई , (दिव्य न्युज):- मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून राजकीय वातावरण दिवसेंदिवस अधिक तापत चालले आहे. या प्रकरणावरून मंत्री धनंजय मुंडे हे सर्वाधिक निशाण्यावर आले असून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी होत आहे. सुरुवातीला ही मागणी



राष्ट्रवादीचेच मित्र पक्ष असलेल्या भाजपा आमदार सुरेश धस यांनी केली. पण आता धसांनीच मुंडेंची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे धस यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. पण या सर्वातही मुंडे यांच्या राजीनाम्याबाबतची

---




---

## कोंबड्यांचं मासं खाल्ल्यानं जेबीएसची लागण?

### अजित पवारांचं राज्यातील जनतेला एकच आवाहन

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्रात जेबीएसचा कहर सतत वाढतांना दिसत आहे. या आजाराची लागण झालेल्यांची संख्या २०० च्या पार गेली आहे. त्यामुळे राज्यात एकच चिंतेचं वातावरण आहे. आरोग्य विभागाच्या मते, एकूण रुग्णांपैकी १८० रुग्णांना जीबीएसची लागण झाली आहे. या आजारामुळे लोकांमध्ये




भीतीचं वातावरण निर्माण होऊ लागलंय. रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आणि अर्धवट शिजवलेले अन्न किंवा कोंबडीचे मांस खाऊ नये, असे आवाहन केले आहे. पुण्यात कोंबड्यांच्या मांसामुळे जीबीएस पसरल्याची चर्चा असताना जीबीएसचा धोका टाळण्यासाठी अन्न पूर्णपणे शिजवा, असं आवाहन अजित पवार यांनी राज्यातील नागरिकांना केलंय. तर अन्न पूर्ण शिजवल्याने जीबीएसचा धोका टाळण्यासाठी मदत होऊ शकते. दुसरीकडे पशूसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवेरे यांनी देखील अन्न पूर्ण शिजवून खाण्याचा सल्ला दिला आहे.दिल्लीतील जीटीबी रुग्णालयातील औषध विभागाच्या डॉक्टरांच्या मते, हा एक न्यूरोलॉजिकल आजार आहे. या आजाराची लक्षणे स्वाइन फ्लूसारखीच आहेत. ज्यामध्ये सर्दी, खोकला आणि जास्त ताप येतो. या आजाराचे नेमके कारण अद्याप कळलेले नाही. गुइलेन-बॅरे सिंड्रोम हा एक दुर्मिळ पण गंभीर आजार आहे ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती स्वतःच्या नसांवर हल्ला करते. यामुळे अशक्तपणा, सुन्नपणा किंवा अर्धांगवायू होऊ शकतो.

# नवीन प्रदेशाध्यक्षांच्या नियुक्तीवरून नेत्यांची नाराजी?

मुंबई, (दिव्य न्युज):- लोकसभेत राज्यात चांगलं प्रदर्शन करणाऱ्या काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत मात्र, भलताच झटका बसला. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षाने महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बदलण्याचा निर्णय घेतला. आणि नुकतीच, हर्षवर्धन सपकाळ यांची प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. मात्र, या निर्णयामुळे पक्षात नाराजी दिसते आहे. अचानक सपकाळ यांची या महत्त्वाच्या पदावर करण्यात आलेल्या नियुक्तीमुळे पक्षातील वरिष्ठ नेता नाराज असल्याचे दिसते आहे.

गेल्या वर्षाच्या अखेरीस महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या पुढाकाराने तयार करण्यात आलेल्या महाविकास आघाडीला (चत-) मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला होता. या निवडणुकीत शिवसेना (उद्धव गट) २०, काँग्रेस १६ तर राष्ट्रवादी - शरद पवार गटाला अवघ्या १० जागांवर समाधान मानावे लागले होते.



तर दुसरीकडे भाजपच्या अध्यक्षतेखालील महायुतीने जोरदार मुसंडी मारत २३० जागांवर विजय मिळवला होता. यात भाजपाला १३२, तर त्याचे मित्र पक्ष शिवसेना - ५७ आणि राष्ट्रवादीला ४१ जागा मिळाल्या.

या सगळ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष बदल्यात आला आहे. मात्र, यानंतर नेत्यांची नाराजी समोर आली आहे. कारण, विधानसभा निवडणुकीतली खराब कामगिरीनंतर पक्षाच्या राज्यातील अस्तित्वाबाबतच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एका इंग्रजी वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानुसार, हर्षवर्धन सपकाळ यांच्या नावावर पक्षश्रेष्ठींनी शिक्कामोर्तब करणे, ही बाब माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, सतेज पाटील आणि विश्वजीत कदम यांना पचलेली नाही.

काँग्रेसच्या एका नेत्याने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या पाच वर्षांत सपकाळ यांच्याकडून कोणतीही मोहीम राबवली गेली नाही. जेव्हा राज्यात मविआचे सरकार होते, आणि काँग्रेस सरकारमध्ये होती तेव्हाही सपकाळ कुठे दिसले नाहीत. विधानसभा निवडणुकीतील खराब कामगिरीनंतरही सपकाळ कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी पुढे आलेले दिसले नाहीत.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी इंग्रजी वृत्तपत्राला दिलेल्या प्रतिक्रियेनुसार, महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून सपकाळ यांचे नाव समोर आले, तेव्हा मला स्वतःलाच आश्चर्य वाटले. कारण, त्यांच्या नावाची चर्चा देखील झाली नव्हती. आम्ही पक्षश्रेष्ठींना सतेज पाटील यांचे नाव सुचवले होते. पण, त्यांनी हे पद स्वीकारण्यास नकार दिला असावा. सपकाळ यांना राज्यातील पक्षाची घडी नीट करण्यासोबतच उद्धव ठाकरे आणि शरद पवार या नेत्यांना देखील शह द्यायचा आहे. दरम्यान, हर्षवर्धन सपकाळ यांच्या नियुक्तीमुळे आपण नाराज असल्याचे वृत्त काँग्रेसच्या कोल्हापूर जिल्हा विभागाचे अध्यक्ष सतेज पाटील यांनी खोडून काढले आहे. सपकाळ यांची नियुक्ती योग्य असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

राज्यात काँग्रेसचे अस्तित्व टिकवून ठेवणे हे आज पक्षासमोरील सर्वात मोठे आव्हान असल्याचे पाटील म्हणाले. यासाठी सपकाळ यांना राज्यातील विविध जिल्ह्यांचा दौरा करण्यासोबतच पक्षातील नेत्यांमधील वाद देखील सोडवावे लागतील. तर सांगलीचे काँग्रेस आमदार विश्वजीत कदन यांनी सांगितले की, या निर्णयाबाबत पक्षालाच सवाल करायला हवेत. दरम्यान, पक्षातील अन्य नेत्यांनी पक्षाचा हा निर्णय योग्य असल्याचे म्हटले आहे.

पान १ वरून

## धनंजय मुंडेंच्या मंत्रीपदाच्या

कृषी मंत्री असताना घेतलेल्या निर्णयांची माहिती मागितली आहे. त्यांनी पत्रात कापूस, सोयाबीन आणि तेलबियांच्या उत्पादकतेशी संबंधित पत्रव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, कृषी विभागातील कोट्यवधींचा भ्रष्टाचार उघड करण्याचा इशारा दिला आहे.

मुंडे-धस भेटीनंतरही वाद कायम

संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून आक्रमक भूमिका घेतलेल्या सुरेश धस यांनी काही दिवसांपूर्वी धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मध्यस्थीमुळे ही भेट झाली होती. त्यामुळे धस यांनी या प्रकरणातून माघार घेतली का? असा सवाल उपस्थित झाला. मात्र, धस यांनी हे आरोप फेटाळून लावत ते शेवटपर्यंत लढा देणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

षडयंत्र करणाऱ्यांचा बंदोबस्त करणार - सुरेश धस

या भेटीनंतर सुरेश धस यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देत स्पष्ट केले की, जोपर्यंत संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना फाशी मिळत नाही, तोपर्यंत मी लढा सुरूच ठेवणार आहे. कुणीतरी व्यवस्थितपणे हे षडयंत्र रचले आहे आणि मी त्या षडयंत्रकर्त्यांचा बंदोबस्त करणार आहे.

धस यांच्या पत्रामुळे मुंडे अडचणीत?

सुरेश धस यांच्या या नव्या कारवाईमुळे धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कृषी विभागातील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चा सुरू झाल्या आहेत. आता या प्रकरणातून काय माहिती समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## २६० अधिकारी,

आहेत. नियमांत आणि फुकटात होणाऱ्या कामांसाठीही अधिकारी, कर्मचारी सामान्यांकडून लाच घेत आहेत. काही समजदार लोक याची तक्रार करतात. त्यामुळेच हे भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात अडकत आहेत. त्यांची उघड चौकशी केल्यानंतर सर्व गोळाबेरीज केली जाते. जास्त संपदा आढळल्यानंतर अपसंपदेचा गुन्हा दाखल केला जातो.

२०२५ मध्ये १३२ मासे गळाला

जानेवारी व १३ फेब्रुवारीपर्यंत राज्यात ९३ कारवाया झाल्या. यात १३२ मासे गळाला लागले आहेत. पैकी वर्ग १ चे ९, वर्ग २ चे १६ यांचा समावेश आहे. यामध्ये २८ लाख ४० हजार ४९५ रुपये लाच रक्कम जप्त केली आहे. कारवायांमध्ये महसूल, भूमी अभिलेख व नोंदणी अव्वल असून पोलिस दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

२०२४ मध्ये ३ कोटी जप्त

२०२४ या वर्षात एसीबीने राज्यभरात ६९३ कारवाया करून १ हजार २ आरोपींना पकडले. त्यांच्याकडून ३ कोटी १८ लाख २४ हजार ४१० रुपयांची लाच रक्कम जप्त केली. यामध्ये केवळ वर्ग १ च्या ६२ अधिकाऱ्यांकडून ५८ लाख २६ हजार रुपये जप्त केले होते.

## संपत्ती जप्त करण्याच्या

राष्ट्रवादी काँग्रेसचे सरपंच बापू आंधळे यांच्यावर जून २०२४ मध्ये गोळीबार करून त्यांची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गटा)चे उपाध्यक्ष शशिकांत उर्फ बबन गित्ते याच्यासह पाच जणांविरुद्ध खुनाचा व खून करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा परळी शहर पोलिस ठाण्यात रविवारी सकाळी दाखल करण्यात आला होता. परंतु हा गुन्हा दाखल झाल्यानंतर बबन गित्ते फरार झाला.

पाच जणांनी संगनमत करून शहरातील बँक कॉलनी परिसरात सरपंच बापू आंधळे व ग्यानबा गित्ते या दोघांना बोलावून घेतले. यावेळी बापू आंधळे यांना तू पैसे आणलेस का, असे बबन गित्ते म्हणाला. तेव्हा पैशांच्या कारणावरून त्यांच्यात वादावादी झाली आणि यावेळी बापू आंधळे यांच्यावर बबन गित्ते याने कमरेचा पिस्तूल काढून डोक्यात गोळी मारली व दुसऱ्या एकाने कोयत्याने मारून बापू आंधळे यांना जिवंत ठार मारले. तसेच ग्यानबा गित्ते यास तिसऱ्याने छातीत गोळी मारून जखमी केले, असं आंधळे यांच्या हत्येनंतर देण्यात आलेल्या पोलिस तक्रारीत म्हटलं होतं.

## बावनकुळेंना सेटलमेंटची

भेटण्यापेक्षा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना राजकीय नेत्यांच्या भेटी घडवून आणणं महत्त्वाचं वाटलं. आमचे गावकरी गेल्या अनेक दिवसांपासून हा मुद्दा बोला, असं मला सांगत होते. पण मी आजपर्यंत बोललो नव्हतो, असं देशमुख म्हणाले.

दरम्यान, संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा होण्यासाठी आगामी काळात काय पावलं उचलायची, हे ठरवण्यासाठी आज मस्साजोगच्या गावकऱ्यांनी बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत काय निर्णय घेतला जातो, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

... तर टोकाचं पाऊल उचलणार

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील एकही आरोपी सुटला, तर आम्ही कुटुंब टोकाचे पाऊल उचलू. याला शासन जबाबदार राहील, असा इशारा सरपंच संतोष यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी दिला आहे.

सरपंच हत्या प्रकरणाचे सर्व पुरावे पोलिस आणि तपास यंत्रणेकडे उपलब्ध आहेत. असे असताना कोणीही दगाफटका करू नये. ही आपली प्रामाणिक इच्छा आहे. आष्टी येथील भाजपचे आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या भेटीने आपल्या मनात कसलीही चलबिचल झालेली नाही; परंतु या प्रकरणात एखादा आरोपी वाचविण्यासाठी कोणीही दगाफटका करू नये. सर्व आरोपींना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे, ही आपली प्रामाणिक इच्छा असल्याचेही देशमुख यांनी बोलताना सांगितले

## निधीअभावी काळवटी

होती. जलसंपदा विभागामार्फत हे काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, बदललेल्या दरानुसार या कामाच्या एकूण खर्चात वाढ झाली असल्याचे केज विधानसभा मतदार संघाच्या आ. नमिता मुंदडा यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर संपूर्ण कामासाठी आता ८.११ कोटी रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला. यापैकी भूसंपादनासाठी ४.१७ कोटी रुपये तरतूद केली असून, उर्वरित ३.९४ कोटी रुपयांची मागणी तलावाच्या उंची २ मीटरने वाढवण्यासाठी तसेच दगड बसविणे, मुरुमाचे व काळ्या मातीचे परिक्षण करणे या कामांसाठी करण्यात आली आहे.

यासंदर्भात यापूर्वीच नगरपरिषदेला निधी वर्ग करण्यास सांगण्यात आले होते, मात्र अद्याप निधी मिळालेला नाही. त्यामुळे हे काम रखडले असून, लवकरात लवकर हा निधी मंजूर करावा, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, उंचीवाढीचे काम पूर्णत्वास गेल्यानंतर काळवटीची पाणी साठवण क्षमता ०.५ दलघमीने वाढणार आहे.

## संतोष देशमुखांच्या हत्येत

भाजपकडून संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा वापर केला गेला. हेच भारतीय जनता पक्षाचे राजकारणाचे स्वरूप आहे. मुंबईमध्ये न्यू इंडिया बँक

लूटली गेली आहे. त्यामध्ये भाजपचे लोक आहेत. आत्ता कुठे गेले मुलुंडचे पोपटलाल? कुठे लापला आहे. आत्ता का बोलत नाही, असा टोलाही संजय राऊत यांनी किरीट सोमय्या यांना लगावला.

संजय राऊत यांनी या आधी सुरेश धस आणि धनंजय मुंडेंच्या भेटीवर वक्तव्य करताना म्हटले होते की, बीडमधील प्रमुख नेत्याने मला सांगितले होते की सुरेश धस यांच्यावर विश्वास ठेवू नका. मला तेव्हा समजवले की धस यांची बाजु घेऊ नका ते कधीही पलटी मारतील. वाल्मिक कराड आणि सुरेश धस एकाच नाणाच्या दोन बाजु आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणात विद्यमान आमदाराने अश्रुंचा बाजार मांडला आणि व्यापार केला. धस यांनी जे कृत्य केले आहे ते बीडची जनता नाही तर महाराष्ट्राची जनता देखील लक्ष्यात ठेवेल.

शिंदेची शिवसेना भाजपमध्ये विलिन होणार

संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची खिल्ली उठवली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सुरू असताना एकनाथ शिंदे यांची शिवसेना भाजपमध्ये विलीन होईल किंवा त्यांच्यामधील मोठा गट भाजपमध्ये जाणार असल्याचा दावा देखील संजय राऊत यांनी केली.

## अजित पवारांनीच

चर्चा थांबलेली नाही. तर मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हात वर केले आहेत. परंतु, याबाबत आता महायुतीतील आणि प्रामुख्याने शिवसेना शिंदे गटातील मंत्री स्पष्ट मत व्यक्त करू लागले आहेत.सध्या राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे ती केवळ मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची. कृषी मंत्री असताना मुंडेंनी किती घोटाळा केला, याची पुराव्यासहित माहिती समोर आली आहे. भाजपा आमदार सुरेश धस यांनीच ही माहिती समोर आणली आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष या नात्याने मुंडेंचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी राजकीय वर्तुळात जोर धरू लागली आहे. परंतु, अजित पवारांनीच हात झटकत सिंचन घोटाळ्याच्या आरोपावेळी मी राजीनामा दिला होता, असे म्हटले आहे. त्यामुळे अजित पवारांनी याबाबत थेटपणे निर्णय घेण्यास नकार दिला आहे. ज्यामुळे आता शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी यांनी स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

शिवसेना शिंदे गटातील मंत्री संजय शिरसाट यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या विधानाबाबत विचारणा करण्यात आली. त्यावेळी ते म्हणाले की, पक्षात दोन भूमिका घेऊन चालत नाही, कोणाला काढायचे याचा अधिकार त्यांना आहेत. पक्षाच्या नेत्यांनी हा निर्णय घेतला पाहिजे. त्यामुळे अजित पवारांनीच धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबतचा निर्णय घ्यायला पाहिजे, असे शिरसाट यांनी स्पष्टपणे सांगितले. पण पक्षाचे प्रमुख म्हणून अजित पवारांनीच हा निर्णय घ्यायला पाहिजे, असे मत अनेक मंत्र्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. परंतु, या राजीनाम्याबाबत धनंजय मुंडे यांनीच निर्णय घ्यावा, असे खुद्द पक्षाच्या अध्यक्षांनीच म्हटल्याने मुंडेंच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.